# विपश्यना

साधकांचे
मासिक प्रेरणा

बुध्दवर्ष २५५६, जेष्ठ पौर्णिमा, ४ जून २०१२, वर्ष १ अंक ३

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकेसाठी पहा – http: www.vridhamma.org/newsletter_home.aspx

**धम्मवाणी**

**धम्मं चरे सुचरितं, न नं दुच्चरितं चरे।**
**धम्मचारी सुखं सेति, अस्मिं लोके परम्हि च॥**
*धम्मपद – १६९, लोकवग्गो.*

सध्दर्मानुसार आचरण करावे, दुराचरणापासून दूर रहावे. धर्मचारी ह्या लोकी व परलोकी (दोन्ही जागी) सुखपूर्वक विहार करतो.

## उत्तराधिकारी कोण ?

एखाद्या वडिलांचे एक अथवा अधिक पुत्र असतील तर ते सर्व त्याचे उत्तराधिकारी होतात. त्यांच्या धन-दौलतीचे, मालमत्तेचे मालक होतात. ती वाढवितात अथवा गमावतात.

परंतु धर्माच्या क्षेत्रात असे कधीही होत नाही. भगवान बुद्धांपासून जे विपश्यना शिकले आणि तिचा प्रसार केला, ते सर्व त्यांचे उत्तराधिकारी बनले. त्या उत्तराधिकारी शिक्षकांनी इतरांना विपश्यना शिकवून, त्यात प्रवीण करून, त्यांना आपले उत्तराधिकारी बनविले. अशा प्रकारे पिढयानूपिढया गुरू-शिष्य परंपरेच्या आधारावर ह्या सर्व उत्तराधिकाऱ्यांनी धर्म शिकविला. सम्राट अशोकाच्या वेळी भिक्षू सोण व उत्तर झाले. ते भगवानांचा धर्म शिकून त्यांचे उत्तराधिकारी झाले आणि ह्याच अर्थाने धर्म शिकविण्यासाठी म्यंमाला गेले. तेथे सामान्य लोकांना धर्म शिकविण्यासोबतच त्यांनी काही असे शिष्य तयार केले ज्यांनी भगवानांच्या उत्तराधिकाऱ्याच्या रूपाने ह्या गुरू-शिष्य परंपरेला कायम ठेवले.

भगवान बुध्दांनी कधीही आपला मुलगा राहूल याला आपले उत्तराधिकारी बनविले नाही. पुढे जाऊन गुरू नानकदेवजींनी आपले शिष्य अंगद देवाला आपले उत्तराधिकारी बनविले, आपल्या मुलाला नाही. धर्माच्या क्षेत्रात उत्तराधिकारी तोच होतो जो आपल्या गुरूपासून धर्म शिकविण्याची विद्या प्राप्त करून तिला शिकवू लागतो. ही गुरू-शिष्य परंपरा मागील अडीच हजार वर्षांपासून चालत आलेली आहे व पुढेही चालत राहील.

गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांच्या पासून मी विपश्यना साधना, म्हणजे शुध्द धर्म शिकलो आणि त्यांची प्रबळ इच्छा पूर्ण करीत भारतात येऊन लोकांना धर्म शिकवू लागलो. रंगूनमध्ये रहात असतांना १४ वर्षापर्यंत मी त्यांच्या संपर्कात राहिलो आणि पाहिले की न जाणे किती वेळा त्यांनी ह्या शब्दांचे उच्चारण केले असेल, “भारतातून आम्हाला विपश्यनेच्या रूपाने अनमोल रत्न मिळाले. परंतु आज भारत ह्या रत्नाला गमावून दरिद्री झालेला आहे. हे रत्न पुन्हा भारतात घेऊन जाऊन आम्हाला भारताचे कर्ज फेडावयाचे आहे. हे कर्ज अजून कोण फेडू शकेल बरे! मीच फेडीन.” त्यांनाच भारतात येऊन अनमोल कर्ज फेडावयाचे होते.

ते स्वतः भारतात येऊन येथे विपश्यनेचे पुनरुज्जीवन करू इच्छित होते, परंतु त्या दिवसात ब्रम्हदेशी नागरिकांना दोनच कारणांमुळे पासपोर्ट दिला जात होता – ज्यांना ब्रम्हदेश सोडून कायमचे निघून जायचे असेल अथवा ज्यांना बाहेर नोकरी मिळत असेल. सयाजी ऊ बा खिन ना तर कायमचे ब्रम्हदेश सोडू इच्छित होते आणि ना भारतात येण्यासाठी एखाद्या खोट्या नोकरीचा आधार घेऊ इच्छित होते. त्यामुळे सरकारने त्यांना पासपोर्ट दिला नाही आणि ते भारतात येऊ शकले नाहीत. परंतु एका अत्यंत विशिष्ट कारणामुळे मला सौभाग्याने ब्रम्हदेशाचा पासपोर्ट मिळाला. माझी आई मुंबईत मानसिक रूपाने अस्वस्थ झाली होती आणि मला माहीत होते की जर ती विपश्यना करेल तर स्वस्थ होईल. ब्रम्ही कॅबिनेटमध्ये माझे दोन घनिष्ठ मित्र होते. त्यांनी माझे जोरदार समर्थन केले आणि ह्या विशेष कारणामुळे मला पासपोर्ट मिळाला.

गुरुदेव ह्या घटनेमुळे खूप प्रसन्न झाले. ते म्हणाले की जरी मी स्वतः भारताचे कर्ज चुकवू शकत नाही, परंतु आता हे काम माझ्यातर्फे तुम्हाला करावे लागेल. त्यांच्याव्दारे विपश्यना विद्येत पारंगत होऊन मी भारतात आलो आणि गुरुदेवांच्या ह्या उद्देशाच्या पूर्तीस लागलो. त्यामुळे धर्माच्या क्षेत्रात गुरु-शिष्य परंपरेच्या अनुसार मी गुरुदेव सयाजी ऊ बा खिनांचा उत्तराधिकारी झालो. मी भारतात अनेकांना विपश्यनेची शिकवण दिली आणि काहींना आचार्य पदावर स्थापित केले. जे आचार्य पदावर स्थापित झाले ते विपश्यना शिकवित माझे उतराधिकारी झाले. ह्या प्रकारे गुरुदेवांच्या स्वप्नांना साकार होतांना पाहून माझ्या मनावरील दडपण हलके झाले. ब्रम्हदेशावर भारताचे जे कर्ज होते ते चुकते करण्याचे काम सुरु झाले

पुढे जाऊन विपश्यनेची अनेक केंद्रे बनली आणि हळू-हळू भारतातच नाही तर जगाच्या अनेक देशात केंद्रे बनत राहिली. जेथे-जेथे ही केंद्रे स्थापित झाली तेथे-तेथे त्या सर्व केंद्रांवर प्रशिक्षण देणारे आचार्य माझे उत्तराधिकारीच आहेत. कारण मी त्यांना जी विपश्यना शिकविली, तिला ते पसरविण्याचेच काम करीत आहेत.

जेव्हा दूर-दूरच्या अनेक स्थानांवर विपश्यनेची अनेक केंद्रे बनली आणि बनतच जात आहेत. तेव्हा मी निश्चय केला की प्रत्येक स्थानिक केंद्रावर प्रशिक्षकाच्या रूपाने एक-एक वेगळे-वेगळे उत्तराधिकारी असावेत. परंतु जेथे कोठे आवश्यक असेल, तेथे त्यांना सल्ला देण्यासाठी अनेक प्रादेशिक आचार्यही नियुक्त असावेत. जेथे अनेक प्रादेशिक आचार्य काम करीत आहेत, तेथे आवश्यक असल्यास एका-एका मोठ्या क्षेत्रासाठी एक भौगोलिक आचार्य असावा. केंद्रीय आचार्य, प्रादेशिक आचार्य व भौगोलिक आचार्यांची नियुक्ती झाल्यावर ते सर्व माझे उत्तराधिकारी मानले जातील. ह्यांची नावे मी लवकरच प्रसिध्द करीन.

एखाद्या केंद्राचा अथवा प्रादेशिक वा भौगोलिक क्षेत्राचा उत्तराधिकारी होण्याचा अर्थ हा नाही की तो त्या-त्या केंद्राचा अथवा क्षेत्राचा मालक झाला. सर्व आचार्य केवळ प्रशिक्षण-क्षेत्राचे उत्तराधिकारी आहेत.

असेच केंद्राचे संचालन करणाऱ्या विश्वस्तांचा कोणताही उत्तराधिकार असत नाही. कोणत्याही केंद्रात कोणताही मान-सन्मान अथवा पद-प्रतिष्ठा प्राप्त करण्याचा अधिकारही असत नाही. ते सर्व धर्मसेवक आहेत आणि केंद्राची आवश्यकतेनुसार सेवा करतात. ज्या कोणी व्यक्तीने धर्मस्थळासाठी जागा दान दिली अथवा कोणी त्यावर एखादी इमारत बांधून दिली, तेव्हा दान दिलेल्या जमिनीवर वा त्यावर बनविलेल्या इमारतीवर, त्याची कोणतीही मालकी होऊ शकत नाही. मालकी धर्माची असते, दात्याची नाही. त्यांना आपापल्या दानाचा व सेवेचा अमूल्य पुण्यलाभ प्राप्त होतो, बस इतकेच.

उदाहरणार्थ भगवान बुध्दांच्या काळात अनाथपिंडिकाने सोन्याची नाणी जमिनीवर अंथरून भगवानांना भूमीचे दान दिले. त्या भूमीवर खूपसे धन खर्च करून निवासाच्या आवश्यकतांचीही पूर्ती केली. एवढे केल्यावरही अनाथपिंडिक धर्माच्या परंपरेला खूप चांगला समजत होता की दान दिलेली भूमी व त्यावरील बनविलेल्या इमारतींवर त्याचा थोडासाही अधिकार नाही. जे एकदा दान दिले ते दिले. त्याऐवजी काही प्राप्त करण्याची भावना अत्यंत दोषपूर्ण आहे. त्याने पाहिले की वर्षावासानंतर जेव्हा भगवान आपल्या भिक्षूंसोबत इतर प्रदेशात विहारासाठी जातात तेव्हा हा विहार एकदम निर्जन होतो. भगवान असतांना जी गर्दी असते ती आता नसते. त्याची खूप इच्छा होती की भगवानांच्या अनुपस्थितीतही लोकांची गर्दी सतत रहावी. ह्या कारणासाठी तो त्या भूमीवर भगवानांचे एक मंदिरासारखे स्थान बनवू इच्छित होता. परंतु खूप इच्छा असूनही असे करू शकला नाही. कारण जी भूमी दान दिलेली होती, तिच्यावर त्याचा कोणताही अधिकार नव्हता. त्यामुळे आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी तो भगवानांजवळ प्रार्थना करण्यासाठी गेला की त्याला तेथे एक मंदिर बनविण्याची परवानगी द्यावी. जर दान दिलेल्या भूमीवर त्याची मालकी असती तर त्याला भगवानांची परवानगी घेण्याची काय आवश्यकता होती? भगवानांनी परवानगी दिली नाही. कारण त्यांची इच्छा नव्हती की धर्माचे स्थान पूजा-अर्चना आणि गर्दी इत्यादीसाठी असावे. ते तर ध्यानासाठी असते. त्यामुळे भगवानांनी बोधिवृक्षाची शाखा मागवून तेथे लावविली आणि म्हणाले, 'हे वाढल्यावर लोक ह्याखाली बसून ध्यान करतील. अशा प्रकारे ह्या जमिनीचा लोकांना खरा लाभ मिळेल.'

ह्याच प्रकारे आजही जमिनीचे अथवा त्यावरील केंद्र बनविण्याचे दान देणाऱ्या व्यक्ती ह्या पुरातन परंपरेला खूप चांगल्या रितीने समजत राहोत की दिलेल्या दानावर त्यांचा थोडासाही अधिकार असू शकत नाही. धर्माची ही शुध्द परंपरा कायम राहील तेव्हाच धर्माचा योग्य विकास होत राहील. येथे सदैव पिढयान्पिढया धर्माचेच प्रशिक्षण दिले जात राहील. केंद्राचे आचार्य वेळोवेळी बदलत रहातील. परंतु धर्म प्रशिक्षणाचे कार्य सतत चालूच राहील.

विपश्यनेच्या अनेक केंद्रांची स्थापना झाल्यावर माझ्या मनात काही इतर महत्वपूर्ण विचार आले, ज्यांचा विपश्यनेच्या प्रशिक्षणाशी काहीही संबंध नव्हता. एक महत्वपूर्ण विचार तर हा आला की भगवान बुध्दांची पावन शिकवण भारतातून कशी पूर्णपणे नाहीशी झाली? ह्याचे संशोधन व्हावे आणि भारत व जगात आता पुनः जागृत झालेल्या ह्या विद्येची संपूर्ण प्रशिक्षण सामग्री शतकांपर्यंत सुरक्षित रहावी. त्यासोबतच भगवानांच्या शिकवणुकीचे प्रमुख साहित्य 'त्रिपिटक' म्हणजे हिचा परियत्ती-पक्ष (Theoretical aspect) जो भारतातून नाहीसा झाला होता, तो ही पुनः प्रकाशित व्हावा. ह्यासाठी **'विपश्यना विशोधन विन्यास'** च्या नावाने एक शोध संस्था निर्माण व्हावी. येणाऱ्या युगात बुध्दांच्या शिकवणुकीच्या पुनरुज्जीवनाशी संबंधित सारे साहित्य हिच्याजवळ सुरक्षित रहावे. एवढेच नाही तर आज व पुढेही शतकांपर्यंत ह्याचा उपयोग व संशोधन होत रहावे. ह्या संशोधनासाठी शोध करणारे भिन्न-भिन्न मर्मज्ञ वेळोवेळी सेवेत लागत राहतील. म्हणजे या संशोधन कार्यात गुरु-शिष्य परंपरा बिल्कुल राहाणार नाही. म्हणून जेव्हा याचे ट्रस्ट डीड बनेल तेव्हा ह्या विशोधन संस्थेसाठी माझ्याद्वारे एक योग्य उत्तराधिकारी बनविण्याचे प्रावधान ठेवण्यात येईल.

माझ्या मनात दुसरा विचार हा आला की भगवान बुध्दांच्या पावन धातूंचा योग्य सन्मान तेव्हाच होईल जेव्हा ते भगवानांच्या मार्गदर्शनानुसार एका भव्य स्तूपात ठेवण्यात येतील. हे भव्य स्तूप ब्रम्हदेशाच्या स्थापत्य कलेच्या आधारानेच बनावे. हे यासाठी की ब्रम्हदेशाने सम्राट अशोकाव्दारे प्राप्त झालेली परियत्ती, म्हणजे बुध्दवाणी व पटिपत्ती म्हणजे विपश्यनेला गुरु-शिष्य परंपरेने पिढ्यान्पिढ्या दोन हजार वर्षापर्यंत शुध्द रूपाने कायम ठेवले. तेव्हाच ह्या दोन्ही आम्हाला प्राप्त झाल्या. जसे ब्रम्हदेशाच्या लोकांनी भारताचे उपकार मानले कारण येथूनच त्यांना शुध्द धर्म प्राप्त झाला, सोबतच सम्राट अशोकाचेही उपकार मानले ज्याच्या प्रयत्नांमुळे त्यांना धर्म प्राप्त झाला. ह्याच प्रकारे आज भारताचे लोकही ब्रम्हदेशाचे उपकार मानोत आणि सोबतच सयाजी ऊ बा खिनांचेही उपकार मानोत, ज्यांनी ब्रम्हदेशाचे कर्ज फेडण्यासाठी मला पूर्णरित्या प्रशिक्षित करुन भारतात पाठविले. ह्या दोघांच्या उपकारांची पावन स्मृती दिर्घकाळापर्यंत टिकून रहावी, ह्या निमित्ताने माझ्या मनात एक भव्य स्तूप - **विश्व विपश्यना पगोडाच्या** निर्माणाची योजना जागृत झाली. हा जगभरातील बुध्दानुयायींसाठी, विशेष करून विपश्यी साधकांना आवाहन करण्यासाठी एक आकर्षक प्रकाश स्तंभ होईल. ह्यासाठी **'ग्लोबल विपश्यना फाउंडेशन'** चे निर्माण केले जाईल आणि हे ध्यानात ठेवले जाईल की ह्या पगोड्याचे बांधकाम ब्रम्हदेशी स्थापत्य व वास्तुकलेच्या अनुसार असावे ज्यामुळे आजच नाही भविष्यातही लोकांना ब्रम्हदेश व सयाजी ऊ बा खिनांच्या उपकारांची आठवण येत राहील.

माझ्या ह्या कल्पनेनुसार पगोडा निर्माण झाला. ज्यामध्ये भारत व शेजारील देशाच्या विपश्यी साधकांनी व निरनिराळ्या बुध्दभक्तांनी श्रध्दापूर्वक दान दिले. कोणीही हा विचार करून दान दिले नाही की मी पगोडाचा ट्रस्टी बनेन अथवा ह्याचा अध्यक्ष बनेन अथवा गुरुजी न राहिल्यावर मालक बनेन. ह्या दात्यांमध्ये मला एका सर्वश्रेष्ठ दानाची

आठवण येत राहाते, ज्यामुळे माझ्या डोळ्यात अश्रू आले. पगोड्याच्या उद्घाटन समारंभात ह्याच्या मुख्य कक्षात (डोम) दानासाठी एक छोटासा कलश ठेवला होता. मी पाहिले की डोक्यावर टोपली घेऊन घरोघरी भाजीपाला विकून जीवन जगणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायिनी एका महिलेने जेव्हा पाहिले की भगवान बुध्दांच्या नावाने इतका विशाल पगोडा बनत आहे, तेव्हा तिने आपल्या साडीच्या पदरात बांधलेले काही रुपये काढून श्रध्दापूर्वक दान-पात्रात टाकले, ज्यांच्या खणखणाटाने मला भावविभोर बनविले. त्या गरीब महिलेचे दान किती सात्त्विक आणि मौल्यवान होते! कोट्यावधींचे दान देणाऱ्यांपेक्षाही अधिक सुफलदायी होते! ती काही अशा दान देणाऱ्यांसारखी कसा विचार करेल की मी कधी ह्या पगोड्याची ट्रस्टी वा अध्यक्ष बनेन अथवा पुढे जाऊन ह्याची मालकीण बनेन? काहीही प्राप्त न करण्याच्या भावनेने दिलेले त्या गरीब महिलेचे हे शुध्द दान खरोखर इतिहासात आठवण ठेवण्यासारखे होईल. बदल्यात काहीही प्राप्त न करण्याच्या भावनेने दिलेले दानच दान आहे अन्यथा व्यवसाय आहे.

ह्या पगोड्याच्या परिसरात भगवान बुध्दांच्या जीवनकाळाचे एक चित्र प्रदर्शन बनले, जे बनविण्यासाठी ब्रम्हदेशाचे प्रमुख कलाकार बोलविण्यात आले. असे झाल्यावर ह्या चित्रकलेला, वास्तुकलेला व पगोड्याच्या भव्य विशेषतेला कायम ठेवण्यासाठी जे ट्रस्ट-डीड बनले त्यात माझ्याव्दारे उत्तराधिकारी नियुक्त करण्याचे प्रावधान ठेवले. ह्या उत्तराधिकाराचा एक व्यक्ती विशेष रूपाने ब्रम्हदेशी कला व पगोड्याच्या ब्रम्हदेशी स्थापत्यकलेच्या देखभालीसाठी जबाबदार राहील. दुसरे चार विपश्यनेचे आचार्य असतील जे विशाल ध्यानकक्ष व पगोडा-परिसरात कोठेही काही धर्माविरुध्द कार्य होऊ नये ह्याची देखरेख करतील. त्यामुळे ह्या ट्रस्टमध्ये एकाच्या ऐवजी पाच उत्तराधिकारी नियुक्त करून मी ट्रस्टच्या मूळ प्रावधानाला आवश्यकतेनुसार निभविले.

तिसरी आवश्यकता ही जाणवली की ह्या पगोड्याच्या देखरेखेसाठी, निरनिराळी स्मृती-चिन्हे आणि ब्रम्हदेशी वास्तुकलेच्या दुरुस्तीसाठी आवश्यक रकमेच्या पूर्तीसाठी **'सम्यक वाणिज्य चैरिटेबल ट्रस्ट'** चे निर्माण केले जावे. येथेही गुरु-शिष्य परंपरेचा काही नियम नसल्यामुळे माझ्याव्दारे एक उत्तराधिकारी नियुक्त करण्याचे प्रावधान ठेवण्यात आले. म्हणजे विपश्यनेच्या प्रशिक्षण केंद्रांपेक्षा वेगळ्या अशा केवळ ह्या तीन वरील प्रतिष्ठानांतच माझ्याव्दारे उत्तराधिकारी नियुक्त करण्याचे प्रावधान आहे.

ह्या तिन्ही संस्था माझ्या स्वप्नांची निर्मिती आहे. ह्या तिन्ही संस्थांची निर्मिती भिन्न-भिन्न उद्देशांसाठी झाली आहे. ह्या तिन्ही संस्थांना माझ्यानंतरही चिरकालापर्यंत स्थायी ठेवणे आवश्यक समजतो. म्हणून ह्या तिन्हीतही उत्तराधिकारी नियुक्त करण्याचे प्रावधान ठेवण्यात आले आहे. त्यामुळे ह्यात आता उत्तराधिकारी नियुक्त केले जातील. ते आपल्यानंतर अन्य योग्य व्यक्तींना आपापल्या जबाबदारीच्या कामांना करीत राहण्यासाठी नियुक्त करतील. ज्यामुळे ही तिन्ही कार्य पिढ्यान्‌पिढ्या चांगल्या पध्दतीने चालत राहातील.

गुरुदेव सयाजी ऊ बा खिनांव्दारे भारताचे कर्ज फेडण्याचा जो प्रश्न होता त्यासाठी विपश्यना केंद्राचे निर्माण ह्याच पध्दतीने झाले. ज्यामध्ये पुरातन काळापासून चालत येणाऱ्या गुरु-शिष्य परंपरेलाच आधार बनविण्यात आले आहे. कारण जो लोकांना धर्म शिकवितो आणि त्यांच्यात धर्म जागवितो तोच विपश्यनेच्या प्रशिक्षण केंद्राचा उत्तराधिकारी होतो. येथे जे काही आचार्य आज नेमलेले आहेत अथवा भविष्यात होतील ते सर्व उत्तराधिकाऱ्यांचेच काम करतील. ह्याच कारणामुळे ह्या विपश्यना केंद्राच्या निर्मितीत कोणत्याही प्रशिक्षित आचार्याला सोडून इतर कोणालाही उत्तराधिकारी बनविण्यात येऊ शकत नाही. कारण जितकीही विपश्यना केंद्रे आहेत त्यांच्यासाठी तर प्रशिक्षक आचार्य उत्तराधिकारी होतीलच, त्यांच्यानंतरही जे जे आचार्य होतील, ते सर्व गुरू शिष्य परंपरेच्या आधारावरच उत्तराधिकारी होतील. ह्याच कारणामुळे याच्या ट्रस्ट-डीडामध्ये माझ्याव्दारे कोण्या उत्तराधिकाऱ्याच्या नियुक्तीचे वर्णन आवश्यक समजले गेले नाही. परंतु वरील तिन्ही संस्था ज्या विपश्यनेच्या प्रशिक्षणासाठी नाहीत, त्यात माझ्याव्दारे विशेष रूपाने उत्तराधिकारी नियुक्त करण्याचे प्रावधान अवश्य ठेवले गेले.

ह्या बाबीची पुनरावृत्ती करतो आणि सर्वांना खूप चांगल्या प्रकारे समजले पाहिजे की धर्माच्या क्षेत्रावर कोणाचीही मालकी नसते, न उत्तराधिकाऱ्यांची न ट्रस्टींची, न दान-देणाऱ्यांची, न शासनाधिकाऱ्यांची. सर्वांना केवळ आपापले नेमून दिलेले काम करण्याचा अधिकार आहे. धर्माचे सारे कार्य खूप शांतिपूर्वक चालले पाहिजे. कोणाच्याही मनात कोणताही मिथ्या संशय असेल अथवा भ्रांती असेल तर मला भेटून ती दूर करावी. मंगल भावनांसह धर्माचे काम चालत राहावे, ह्यातच सर्वांचे कल्याण आहे.

कल्याणमित्र

सत्यनारायण गोयन्का

## मंगल मृत्यू

२८ एप्रिलला सकाळी पाच वाजता जेव्हा स्टीवने शांतिपूर्वक व पूर्ण जागरुकतेसोबत शरीर सोडले तेव्हा याच्या काही तास अगोदर आपल्या दोघांचीही मैत्री मिळून तो खूप प्रसन्न झाला. मैत्रीसाठी धन्यवाद! त्याचा फुफ्फुसाचा कॅन्सर खूप त्वरित पसरला होता आणि मृत्यूच्या पूर्वी एक आठवड्यापर्यंत त्याला पैलियेटिव केयर दवाखान्यात ठेवण्यात आले. सोमवारी त्याला श्वास घेणे खूप कठीण जात होते आणि तो बोलूही शकत नव्हता, परंतु पूर्ण शुध्दीत होता आणि खुणा करुन बोलू शकत होता. पूर्ण रात्र मी त्याच्या सोबत ध्यान करीत राहिले आणि जेव्हा शेवटची वेळ आली तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर चिंता नव्हती आणि तणावही नव्हता. श्वास हळूहळू येत-जात होता आणि मग अचानक बंद झाला.

(क्रिस्टीन स्मिथ, आस्ट्रेलिया)

## विपश्यना ग्लोबल पगोड्यावर धर्मसेवा.

ग्लोबल विपश्यना पगोड्यामध्ये भगवान बुध्दांच्या पावन शरीरधातूंच्या सान्निध्यात सेवा देण्याची अमूल्य संधी आहे. स्वेच्छापूर्वक धम्मसेवेसाठी उत्सुक साधक-साधिकांकडून आवेदन-पत्र आमंत्रित करण्यात येत आहेत. मुंबईच्या त्या साधकांनीच आवेदन करावे जे पगोड्यात दिवसभर सूचना-सेवा-सदस्यांच्या रूपाने सेवा देऊन घरी परत जाऊ शकतील.

**योग्यता -** सुशिक्षित जुने विपश्यी साधक जे मोजक्या शब्दात परिसरात आलेल्या पर्यटकांना माहिती देऊ शकतील. शांत स्वभावाचे व आकर्षक व्यक्तित्वाचे असावेत. प्रवास-खर्चासह भोजनाचीही व्यवस्था केली जाईल. ह्यासोबतच त्यांना पगोड्यात ध्यान करण्याची सुसंधीही मिळेल. विपश्यनेच्या प्रसारात योगदान देण्याची ही खूपच दुर्लभ आणि ऐतिहासिक संधी आहे.

**संपर्क :** guides@globalpagoda.org; श्री सारंग नांदेडकर, ०२२-३३७४७५०१/६

**विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी व दर्शन विभाग, मुंबई विश्वविद्यालयाच्या, संयुक्त सहयोगाने बुध्दांची शिकवण (विपश्यना म्हणजे परियत्ति व पटिपत्ति) यामध्ये एक-वर्षीय डिप्लोमा कोर्स (वर्ष २०१२-२०१३)**

**पाठ्यक्रम -** ह्यात परियत्ति व पटिपत्ति दोन्ही आहेत – पालिभाषा व पाली साहित्यात प्रवेश, त्रिपिटकातून निवडलेले सुत्त, भगवान बुध्दांचे जीवन आणि त्यांची शिकवण. विपश्यना साधनेचे सिध्दांत व विधी, स्वास्थ्य, शिक्षण, सामाजिक विकास इत्यादी क्षेत्रात विपश्यनेचा व्यावहारिक उपयोग व अजूनही बरेचसे अन्य विषय.

**स्थान--** दर्शन विभाग, ज्ञानेश्वर भवन, मुंबई विश्वविद्यालय, विद्यानगरी कैम्पस, कालीना, सांताक्रुज (पूर्व), मुंबई - ४०००९८.

**वेळ -** प्रत्येक शनिवारी दुपारी २ से ६ वाजेपर्यंत.

**कोर्सचा कालावधी -** २१ जुलै २०१२ ते ३१ मार्च २०१३

**आवेदन पत्र -** दर्शन विभागात (सोमवार ते शुक्रवार, ११.३० ते २.३० वाजेपर्यत) २ जुलै ते १७ जुलै २०१२ पर्यंत घेता येतील.

**योग्यता –** जुने एस. एस. सी. व नवे एच. एस. सी. (१२ वीं उत्तीर्ण)

**आवश्यकता–** दिपावलीच्या सुटीत एक दहा-दिवसीय विपश्यना शिबिर करणे आवश्यक आहे. तेव्हाच परीक्षेत बसण्याची अनुमती मिळेल.

**शिक्षणाचे माध्यम–** इंग्रजी

**संपर्क–१)** श्रीमती शारदा संघवी - फोन: (०२२-२३०९५४१३) ०९२२३४६२८०५, २) श्रीमती बलजीत लाम्बा– फोन: (०२२)२६२३७१५०, ०९८३३५१८९७९ ३) अलका वेंगुलकर मोबाईल - ०९८२०५६३४४०

**एका तासाची लघू आनापान शिबिरे**

पूज्य गुरूदेवांनी लाखो लोकांच्या हित-सुखाला ध्यानात ठेऊन सर्वांसाठी एका तासाची **लघू आनापान शिबिरे** आयोजित करण्याची सूट दिली आहे. **ग्लोबल पगोड्यात** रोज सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत व संध्याकाळी ४ ते ५ वाजेपर्यंत ह्या शिबिरांच्या आयोजनास सुरवात झाली आहे. १० वर्षापेक्षा जास्त वयाच्या सर्व लोकांना ह्यात भाग घेता येऊ शकेल. पूर्ण तासभर हॉलमध्ये बसणे अनिवार्य आहे.

**सहायक आचार्य कार्यशाळा**

धम्मगिरीमध्ये २४ ते २८ ऑक्टोंबरपर्यंत आपले बुकिंग करवून जास्तीत-जास्त सहायक आचार्य ह्या कार्यशाळेचा लाभ घेऊ शकतील.

**गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने पूज्य गुरूदेवांच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिबिर**

८ जुलै २०१२ रविवार, वेळ - सकाळी ११ वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पगोडा'** च्या मोठ्या धम्मकक्षामध्ये (डोममध्ये). कृपया ध्यान द्यावे की ह्या विशाल शिबिरात आपल्याला कोणत्याही प्रकाराची असुविधा होऊ नये ह्यासाठी विना बुकिंग येऊ नये.

**बुकिंग संपर्क:** मो. ०९८९२८५५६९२, ९८९२८५५९४५, फोन नं. - ०२२-२८४५११७०, ३३७४९५४३, ३३७४९५४४ (सकाळी ११ ते सायं ५ वाजेपर्यंत रोज) ईमेल Registration: oneday@ globalpagoda.org

OnlionRegistration:www.vridhamma.org

**दोहे धर्माचे**

**पंचशील पालन करा, द्या मनपूर्वक दान।**
**करा ध्यान भावना, अनमोल धर्म हा जाण॥**

**पुण्य कर्म संचित करा, नको पाप लवलेश।**
**मन निर्मळ करत रहा, हाच धर्म संदेश॥**

**आई-वडिलांची वंदना, गुरुजनांचा सत्कार।**
**समता असावी मित्रात, पत्नीशी प्रेम व्यवहार॥**

**परिवाराचे पालन करा, करा दान उन्मुक्त।**
**सदा ऋण मुक्त रहा, भेटे सुख उपयुक्त॥**

**दोहे धर्माचे**

**मन प्रमोदित होई, परहितासाठी दिले दान।**
**प्रमोदाच्या ह्या बीजाने, सुख निपजे अपार जाण॥**

**समजून धर्माच्या मर्माला, नंतरच द्यावे दान।**
**दान दिले मन मृदू झाले, मृदू मन सुखाची खाण॥**

**सुमनाने दान द्यावे, सुमनाने सुखी होती जन।**
**सुख आपले हरवे त्वरित, करता दूषित मन॥**

**दान दिले अन मूर्ख, दवंडी पिटवून घेई।**
**दान दिले यश स्वतःच, विना बोलाविता येई॥**

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
**Website:** www.vridhamma.org